# कृषि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय
डॉ. बा.सा.को.कृ.वि, दापोली -४१५७१२,जि. रत्नागिरी

फोन- ०२३५८- २८२४१४ फॅक्स– ०२३५८-२८२४१४ ईमेल -adcaetdapoli@gmail.com


जाक्र.कृअतंम/कृप्रअ/बेकरी युनिट/ 48 1392/२०१९ दिनांक : 24 MAY 2019

## पाहिजेत(Walk in Interview)

कृषि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय, दापोलीच्या कृषि प्रक्रिया अभियांत्रिकी विभागांतर्गत बेकरी प्रक्रिया प्रशिक्षण केंद्रामध्ये निव्वळ (कंत्राटी पध्दतीने) तात्पुरत्या स्वरूपात अकरा महिन्यांकरीता कंत्राटी तत्वावर २०१९–२० या आर्थिक वर्षा मध्ये खालील पदे भरावयाची आहेत. त्यासाठी पात्र उमेदवारांनी आपल्या मूळ शैक्षिणिक व अनुभव प्रमाणत्रांसह **दिनांक ११.०६.२०१९** रोजी**सकाळी १०.०० वाजता'मा. सहयोगी अधिष्ठाता कृषि अभियांत्रिकी अणि तंत्रज्ञान महाविद्यालय, डॉ. बाळासाहेबत सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी'** येथे उपस्थित रहावे.

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या | एकत्रित कंत्राटी देय रक्कम (रू.) |
|---|---|---|---|
| १ | बेकरी कारागीर | ०१ | १६,०००/– |
| २ | बेकरी मदतनीस | ०१ | ९,०००/– |

## अर्हता

**१) कामाचा अनुभव**

**बेकरी कारागीर**

- बेकरी मधील पदार्थ बनविण्याच्या कामाचा पाच वर्ष अथवा अधिक वर्षाचा अनुभव.

**बेकरी मदतनीस**

- बेकरीमधील कामाचा तीन वर्ष अथवा अधिक वर्षाचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य.

**२) वरील दोन्ही पदांसाठी वयोमर्यादा :**

- उमेदवाराचे किमान वय १८ वर्षे पूर्ण व कमाल वय ४५ पेक्षा जास्त नसावे.

**३) नियम व अटी :**

१. बेकरी कारागीर याची नेमणूक २०१९–२० या आर्थिक वर्षा मध्ये कंत्राटी पध्दतीने अकरा महिने कालावधी करीता रू. १६,०००/– प्रति महिना एवढया एकत्रित कंत्राटी वेतनावर करण्यात येईल.

२.बेकरी मदतनीस याची नेमणूक २०१९–२० या आर्थिक वर्षा मध्ये कंत्राटी पध्दतीने अकरा महिने कालावधी करीता रू. ९,०००/– प्रति महिना एवढया एकत्रित कंत्राटी वेतनावर करण्यात येईल.

३. बेकरी कारागीर / बेकरी मदतनीस यांना एकत्रित वेतनाव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा भत्ता देण्यात येणार नाही.

पुढे पहा

४. सदर नेमणूक निव्वह तात्पुरती स्वरूपात करण्यात येईल.

५. सदर आदेश मिळालयापासून सात दिवसांच्या आत त्यांना नेकणूकीच्या ठिकाणी कर्तव्यावर हजर व्हवे लागेल. अन्यथा सदर नेमणूकीचे आदेश रदद् करण्यात येतील.

६. बेकरी कारागीर / बेकरी मदतनीसला देण्यात आलेले काम सोडावयाचे असल्यास त्याने एक महिन्याचे वेतन जमा करावे लागेल.

७. या आदेशान्वये देण्यात आलेली सेवा कोंणतेही कारण न दाखविता केव्हाही समाप्त केली जाईल तो अधिकार महाविद्यालयास असेल.

८. तात्पुरत्या स्वरूपातील नेमणुकीच्या शर्ती व अटी मान्य असल्यास त्याप्रमाणे हमीपत्र रू.१००/— किंमतीच्या स्टॅम्प पेपरवर लिहून देऊन सादर करावे.

९. सर्वोच्य न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचिका क्र. एमएलपी—५४५३/९० निर्णयाच्या अनुषंगाने या नियुक्तीच्या कालावधीनंतर विद्यापीठ सेवेत कायम स्वरूपी नोकरी मिळण्याबाबत हक्क राहाणार नाही.

१०. या पदावर कार्यरत असणारे कर्मचाऱ्यांचे प्रशासकिय नियंत्रण विभागप्रमुख, कृषि प्रक्रिया अभियांत्रिकी विभाग / सहयोगी अधिष्ठाता, कृ.अ.तं.म., दापोली यांचे अधिनस्त राहील.

११. बेकरी कारागीर / बेकरी मदतनीस हे पूर्व परवानगी न घेता कार्यालयामध्ये अनुपस्थित राहिल्यास ते ज्या दिनांकापासून अनुपस्थ्ति राहिले आहे, त्या दिनांकापासून त्याच्या सेवा समाप्त करण्यात येईल.

१२. बेकरी कारागीर / बेकरी मदतनीस यांची नेमणूक बेकरी प्रशिक्षण केंद्रामध्ये पुर्ण वेळ करण्यात लालेली असलयामुळे त्यांना इतर कुठल्याही बेकरीमध्ये अर्धवेळ/पुर्णवेळ काम करता येणार नाही आणि इतर अतिरिक्त वेतन स्विकारता येणार नाही.

१३. विद्यापीठाचे प्रशासकीय आणि वर्तवणुक नियम हे बेकरी कारागीर / बेकरी मदतनीस यांना बंधनकारक राहिल.

१४. वेळोवेळी सोपविण्यात आलेल्या कार्यालयीन जबाबदाऱ्या पार पाडण्यास बेकरी कारागीर / बेकरी मदतनीस जबाबदार राहतील.

**सहयोगी अधिष्ठाता,**
**कृषि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान**
**महाविद्यालय, दापोली**

प्रत :

सर्व विभाग, कृषि महाविद्यालय, दापोली/कृ.अ.तं.म., दापोली/डॉबासाकोकृवि, दापोली /ग्रामपंचायत जालगांव/ग्रामपंचायत गिम्हवणे /ग्रामपंचायत चंद्रनगर / नगरपंचायत, दापोली.